# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.१२/०५/२०१८

## दि.११/०५/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे १४८/१८,भादविक ४५२,३२४,१४७,१४८,१४९,४२७, ३२३,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | यश केदारी,वय-१९ वर्षे,रा.लोहगाव,पुणे |
| **आरोपी** | एकुण आठ इसम व महिला (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०५/२०१८ रोजी १५/३० वा.ते ०४/०० वा. चे दरम्यान संत तुकाराम महाराज मंदिर जवळ लोहगाव पुणे येथील राहत्या घरामध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्याचे राहते घरी त्यांची बहिण व आजी यांचेसोबत दुपारचे जेवण करत असताना,फिर्यादी यांनी सकाळी त्यांचा चुलत भाऊ प्रमोद केदारी व चुलते गणेश बाळु केदारी यांच्यातील भांडणे सोडवली होती. त्यावेळी फिर्यादी यांनी सुध्दा त्यांचे चुलते यांना मारहाण केली असा समज धरुन,यातील नमुद इसम व महिला यांनी अचानक फिर्यादीचे घरामध्ये घुसुन,त्यांचे डोक्यात लोखंडी सायकलने व डावे डोळ्याच्या भुवईवर लोखंडी रॉड मारुन जखमी केले आहे. तसेच त्यांची बहिण व आजी यांना सुध्दा शिवीगाळ लाथा-बुक्याने मारहाण करुन केस ओढुन जखमी केले. त्यानंतर घरातील एल.ई.डी टिव्ही ओढुन खाली पाडुन फोडुन त्याचे नुकसान करून,फिर्यादी यांचे चुलत भाऊ प्रमोद केदारी याचे आई व पत्नीस शिवीगाळ व हाताने मारहाण करुन धमकी देऊन निघुन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. डी.जे.जाधव ९५५२८३४५४७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे १२१/१८,भादविक ४२०,४६७,४६८,४७१,३४ |
| **फिर्यादी** | संजय गायकवाड, वरिष्ठ लिपीक,प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय,संगमब्रीज,पुणे |
| **आरोपी** | १.प्रकाश कोरुगेटेड प्रा.लिमी.सनसवाडी,शिरुर,पुणे व इतर १८ (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे डिसेबंर २०१७ ते दि.१२/०४/२०१८ रोजीचे कालावधीत प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय,संगमब्रीज,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे प्रादेशिक परीवहन अधिकारी कार्यालय,पुणे येथे वरीष्ठ लिपीक या पदावर काम करीत असताना,यातील नमुद ३६ वाहनांची मालकांनी त्यांचे मालकीचे असलेल्या वाहनांचे नुतनीकरण केलेले बोगस योग्यता प्रमाणपत्र व बोगस मॅन्युअल पासींग फी भरल्याची पावती फिर्यादी यांचे प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय,संगमब्रीज,पुणे या कायालयात खरे आहे असे भासवुन सादर करून,त्याआधारे संगणक प्रणालीवर माहिती अद्यावत करून फिर्यादी यांचे कार्यालयाची तसेच शासनाची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. जमदाडे ९८२२०३०७६९ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मार्केटयार्ड पो स्टे ८२/१८,भादविक ३८५,३८६,५०४,५०६,३४,क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ७ |
| **फिर्यादी** | एक इसम,वय-३६ वर्षे,रा.मार्केटयार्ड,पुणे |
| **आरोपी** | दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०५/२०१८ रोजी २१/३० वा.वाईन शॉपचे दुकान,मार्केटयार्ड, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे वाईन शॉपचे दुकानात हजर असताना,यातील नमुद दोन अनोळखी इसमांनी फिर्यादीं यांचे दुकानातुन दारू खरेदी करून त्याचे २,५००/- रूपये बिल दिले नाही. |

फिर्यादी यांनी त्यास बिलाची रक्कम त्यांना मागीतल्याचे कारणावरून एक दारूची बाटली काऊन्टरवर फोडुन,दुकानातील कॅल्युक्युलेटर वाईन शॉप मध्ये फेकुन फिर्यादी यांचेकडे एक लाख रूपये खंडणीची मागणी केली,ती रक्कम न दिल्यास दुकानात येवुन परत तोडफोड करून दुकानाचे नुकसान करून,फिर्यादी यांना जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच फिर्यादीं यांचे दुकानात असलेल्या कर्मचा-यांना दहशत करून मारहाण केली. सदर इसमांचे दहशतीमुळे दुकानात येणारे गि-हाईक पळुन गेले आहेत.

| | |
|---|---|
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. सागर पाटील ९८२३५६०३६० |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे १०६/१८,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | शशिकांत कोळी,वय-३९ वर्षे,रा.उंड्री,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात व्यक्ती |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०५/२०१८ रोजी दु.१२/३० ते ०१/०० वा.चे दरम्यान मा.लष्कर कोर्टाचे आवारातुन कॅम्प,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी त्यांचे कडील काळे रंगाची बॅग मध्ये ९०,०००/- रूपये रोख रक्कम ठेवुन ती बॅग मा.लष्कर कोर्ट आवारातील पाण्याचे नळा शेजारील फिर्यादी यांचे मालकीचे लोखंडी कपाटावरती ठेवुल ते जेवण करण्यासाठी गेले असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने सदरची रक्कम ही बॅगेमधुन काढुन चोरी करुन घेवुन गेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पी.पी.खेडकर ८८३०५०१४५६ |

**<u>दि.१२/०५/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते द ु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>**

| | |
|---|---|
| **१** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे २३१/१८,भादविक ३०७,१४३,१४७,१४९ |
| **फिर्यादी** | कुणाल ओव्हाळ,वय-१९,रा.कात्रज,पुणे |
| **आरोपी** | एकुण आठ ते नऊ इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०५/२०१८ रोजी १९/३० वा. फाटेआळी कात्रज गांव,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे भाऊ प्रितम ओव्हाळ व मित्र शैलेश बेंबाळगे याचेसह नमुद ठिकाणाहुन जात असताना,यातील नमुद इसमांनी ऋषीकेश व त्याचे मित्रांबरोबर झालेल्या जुन्या भांडणाचे कारणावरून फिर्यादीस जीवे ठार मारण्याचे उद्देशाने विटा व सिमेंटचे ब्लॉकने फिर्यादी यांचे डोक्यात व तोंडावर मारून जखमी केले आहे. तसेच फिर्यादी यांचा मित्र शैलेश यास लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. डी.आर.मदने ९८८१३७०५०१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**